CR1970052022

परिपत्रक

क्रमांक पीन /एल् • आर् • -२२
पुणे, दिनांक २० -५-१९७० •

सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी ( सर्व)

विषय- जमीन एकत्रीकरण योजना
अनुसुचित जमातीचे गट जुळवणीबाबत • • •

भारतीय घटनेच्या परिशिष्ट (५) भाग 'ब' यातील परिच्छेद ५(२) यात अनुसुचित क्षेत्राच्या (Scheduled areas ) व अनुसुचित जमातीच्या (Scheduled tribes) लोकांचे जमिनींची इतर लोकांकडे तबदिलीस बंदी करावी व तबदिली झाल्यास त्या संबंधित जमातीत ( भावकीत) मर्यादित ठेवाव्या' अशा उल्लेख आहे • सबब आदिवासी विभागातील एकत्रीकरणाचे काम करताना आदिवासींच्या वर उधृत केलेल्या हक्कांस एकत्रीकरण योजनेने बाध येऊ नये याकडे योजना आखताना लक्ष देणे जरूरीचे आहे • योजना तयार करताना त्यांना योजनेत जमिनीऐवजी जमीनच मोबदल्यात द्यावी • संमती जबाबाने केलेल्या गटजुळवणी-तही वरील तत्व लक्षांत ठेवावे तसेच अशा खात्यांत शक्यतो किंमतीवर बदल करूनये व असे बदल केल्यास बदल समान किंमतीच्या जमिनींचे करावे • कोणत्याही परिस्थितीत अशा खातेदारांस कमी क्षेत्राची /मगदुराची जमीन व मुळ क्षेत्रापेक्षां कमी पडणाऱ्या क्षेत्राबाबत रोख मोबदला देऊ नये • योजनेत जमिनीऐवजी अदलाबदलीत मोबदला जमीनच देण्यात यावी ही बाब एकत्रीकरण अधिकारी यांनी तपासणीचे वेळी कटाक्षाने पहावी •

सही/-
(स • मो • कमरूद्दीन)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमिअभिलेख, महाराष्ट्र राज्य,
पुणे

प्रत- उपसंचालक भूमि अभिलेख पुणे/नाशिक/नागपूर यांचेकडे माहितीसाठी रवाना •

प्रत- एकत्रीकरण अधिकारी (सर्व) यांचेकडे माहितीसाठी ( सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांचे प्रतीसह) माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना •

निर्गमित-

य. बा. देशपांडे 20/5/70

कु •२०५७० •

सहाय्यक जमाबंदी आयुक्त
(एकत्रीकरण) पुणे •